# पुत्र व्हावा ऐसा गुंडा ?

सहार विमानतळावर चौकशी काउंटरवर करुणा उभी होती. शेजारी तिची सहकारी रेश्मा होती. आज त्यांच्या काऊंटरवर गर्दी नव्हती, त्यामुळे आजूबाजूला नजर फेकीत दोघींच्या गप्पा चालल्या होत्या. एवढ्यात करुणाचे लक्ष प्रवेश द्वाराकडे गेले. एक साठीची बाई व तिचा सुटातला तरुण मुलगा आत शिरले. असे अनेक जण येत असतात व जात असतात पण त्या तरुणाने खिशातून तिचा पासपोर्ट काढून तिच्या हाती दिला व काहीतरी बोलून तो आत शिरला आणि नाहीसा झाला. त्यानंतर जवळ जवळ तास भर ही बाई तो गेला त्या दिशेला नजर लावून त्याची वाट बघत होती. तिच्या खांद्यावर तिची पर्स होती, त्यात तिने तो पासपोर्ट ठेवला व एक हात आपल्या जागेवर ठेवून ऊन ती अवघडून उभी होती. येणारा जाणारा कोणी तिची बॅग, तिची पर्स हिसकावून घेईल ही चिंता तिच्या चेहऱ्यावर दिसत होती. वाट पाहून तिचा चेहरा रडवेला झाला होता, तो पहावत नव्हता. तिच्याकडे जाऊन तिची चौकशी करावी असे प्रकर्षाने वाटत होते, पण ड्युटीवर असताना काउंटर सोडणे योग्य नव्हते.

एवढ्यात एक टी शर्ट पॅन्ट मधला फाटका असा दिसणारा माणूस बाहेरून आता आला. त्याने प्रवेशद्वारावरच्या पोलिसाला काय सांगितले कोण जाणे, तो सरळ तिच्याकडे केला व तिच्या बॅगेला हात घालून तिला चोर म्हणाला. तिने आपली बॅग घट्ट धरली व काहीतरी बोलली. तिने त्याच्या बरोबर बाहेर जायला नकार दिला तसा तो तिला ओढायला लागला. त्याबरोबर ती ओरडली. आता करुणाला रहावेना. ती पटकन तिथे केली व म्हणाली काय प्रकार आहे ? तो मुलगा उघडपणे म्हणाला, "तुला काय करायचंय ? चल गं मावशी घरी." करुणा बघतच राहिली त्या बाईचा एकंदर वेश उभे राहण्याची पद्धत चेहऱ्यावरचा सात्विक भाव यावरून ती या माणसाची संबंधित वाटत नव्हती. त्यामुळे करुणाने तिला विचारले, "हा कोणी तुझा आहे का ? तू कोणाची वाट पहात आहेस ?" तसे ती म्हणाली, "माझा मुलगा आत गेला आहे. तो आला की मी त्याच्याबरोबर जाणार. हा कोण आहे मला माहीत नाही. हा माझी बॅग ओढतोय." त्याबरोबर करूणाने प्रवेशद्वारावरच्या पोलिसांना हाकारले आणि म्हणाली, "हा माणूस कसा आत आला ?" पोलीस म्हणाला, "ही त्याची मावशी आहे व तिला न्यायला तो आला आहे असे त्याने सांगितले." करुणाने त्या मुलाला हाकलून द्यायला लावले.

करुणा त्या बाईला म्हणाली, "तुमचा मुलगा कुठे गेला आहे ?"
"तो आमची फ्लाईट किती वाजताची आहे ते बघून येतो असे सांगून गेला म्हणून मी त्याची वाट पहात आहे."
एवढ्यात तो मगासचा पोरगा आणि एका माणसाला घेऊन आला आणि तो दुसरा माणूस ती आपली आत्या आहे आणि तिला न्यायला आलो असे म्हणाला. करुणाला ते दोघेही लफंगे वाटत होते.

एवढ्यात त्यांची साथीदार असावी अशी बाई आली व "माझ्या बहिणी, किती वेळा तुला सांगायचे तिथे येऊ नकोस म्हणून. चल बाय घरी." असे म्हणून तिची पर्स ओढू लागली. त्या बाईने आपली पर्स घट्ट धरली व जागेवर पाय ठेवून ओरडली, "मी तुम्हाला कोणाला ओळखत नाही. चालते व्हा !" तिची स्पष्ट शुद्ध भाषेतली बोली ऐकून करुणाची खात्री पटली की बाई एकटीच बराच वेळ उभी आहे हे बघून हे तिला लुटायला आले आहेत. तिने तिकडच्या पोलिसांना खडसावून विचारले, "हे लोक आत कसे आले ? त्यांच्याकडे तिकीट किंवा एन्ट्री पास आहे का ?" आणि आपल्या मोबाईलवर तिथल्या इन्स्पेक्टर इन्चार्जला फोन लावला.

"काय गं करुणा ? काय झाले ?"
"रणजित, पटकन माझ्या काऊंटरजवळच्या प्रवेशद्वाराशी या."
"आलोच." म्हणून त्याने फोन ठेवला व दोन मिनिटात ते तिथे पोहोचले. त्यावेळी दोन पोलीस त्या तिघांशी वाद घालत उभे होते व करुणा त्या बाईजवळ तिला धीर देत होती. इन्स्पेक्टरला बघितल्याबरोबर पोलिसाने त्या पोरांची बकोट सोडली व "आत येतात कसे तुम्ही?" असे म्हणून ओरडू लागले.
इन्सपेक्टर म्हणाले, "कमरेत लाथ घाला त्यांच्या आणि त्यांना चौकीवर घेऊन चला. तुम्हाला आज ड्युटी कशी करावी त्याची समज द्यावी लागणार."
ते दोन पोलीस त्यांना घेऊन गेल्यावर त्या बाईंना धीर आला. त्यांनी करुणाकडे बघत म्हटले, "आज तुमच्यामुळे मी वाचले नाहीतर या मुंबईतल्या गुंडाने मला पार लुटले असते."

मग इन्स्पेक्टर रणजितने त्यांना विचारले की हा प्रकार काय आहे. त्या बाई म्हणाल्या, "माझा मुलगा अमेरिकेत न्यूजर्सी स्टेट मध्ये एडिसनला राहतो. तो आज घरी निघाला. महिन्यापूर्वी माझे मिस्टर वारले, त्यासाठी तो आला होता. तो मला त्याच्या घरी घेऊन जाणार म्हणून आम्ही दोघे सकाळी नाशिकहून निघालो. आता तो आपल्या फ्लाईटचा टाईम बघून येतो असे सांगून गेला, तो अजून आला नाही. मी त्याची वाट बघत आहे. माझ्याकडे फक्त माझा पासपोर्ट आहे. तिकीट त्याच्याकडेच असणार."
"तुम्ही कुठल्या फ्लाईटने जाणार ?" असे रणजितने विचारले त्यावर त्या म्हणाल्या, "डायरेक्ट न्यूयॉर्क फ्लाइट आहे ना त्याचे तिकीट जरा जास्तच आहे ना वीस हजार रुपये, म्हणून मी त्याला माझ्या खात्यातले पंचवीस हजार रुपये काढून दिले. तो अजून कसा आला नाही ? त्याला काही झाले तर नाही ना ? मला फार काळजी वाटते." त्यांच्यातील आई रडवेली झाली होती. इन्स्पेक्टर रणजित म्हणाला, "हे बघा एवढा वेळ उभे राहून तुम्ही दमला असाल. या करुणाजवळ बसा. मी तुमच्या मुलाला शोधून आणतो." आणि तो आत गेला.

करुणाने आपल्या शेजारी त्या बाईंना बसवले व चेक केले तर डायरेक्ट न्यूयॉर्क फ्लाइट वेळेवर म्हणजे अर्ध्या तासापूर्वी सुटली होती. तिने बाईंना त्यांच्या मुलाचे नाव विचारले. त्या म्हणाल्या रमेश गोडबोले. तिने पॅसेंजर लिस्ट चेक केली. त्यात ते नाव होते व सर्व पॅसेंजर विमानात गेले होते. तिने विमानातल्या पर्सरला फोन करून या नावाचा का पॅसेंजर विमानात आहे का असे विचारले. त्या बाईबरोबर आलेल्या तरुणाला तिने पाहिले होते त्यामुळे तिने त्याचे वर्णन केले. तसा माणूस तिथे होता. त्याचे नाव त्याने रमेश गोडबोले असेच सांगितले. तिने पर्सरला सांगितले की त्याची आई इथे वाट बघत उभी आहे तर त्याने तसे असूच शकत नाही असे म्हणून कानावर हात ठेवले. करुणाने आता बुकिंग चेक केले. फक्त रमेश गोडबोलेचे बुकिंग होते. त्याच्याबरोबर आणखी कोणाचे बुकिंग नव्हते व त्याचे बुकिंग रिटन जर्नीचे म्हणजे जाऊन येऊन असे होते. आता तिने त्या बाईला त्यांचे नाव विचारले. त्या म्हणाल्या अनसुया गोडबोले. या नावाने बुकिंग कुठल्याच एअर लाईनला नव्हते. म्हणजे या मुलाने आईकडून २५,००० रु. घेऊन तिला आपल्याबरोबर अमेरिकेला नेतो असे खोटे सांगून इथे आणले व या मुंबईच्या महासागरात गुंडांच्या हवाली केले असे तिला वाटले.

करुणाने एवढी माहिती गोळा करेपर्यंत इन्स्पेक्टर रणजित आले व त्यांनी रमेश गोडबोले नावाचा कोणीही माणूस सापडला नाही असे सांगितले. मग करुणाने आपण काढलेली माहिती त्यांना सांगितली. म्हणजे या मुलाने आईला वाऱ्यावर सोडून तो निघून गेला असे रणजीतच्या लक्षात आले. तो म्हणाला, "मावशी नाशिकला तुम्ही कोठे राहता ?" अनसूयेने आपला पत्ता सांगितला व म्हणाल्या, "तेथे माझे स्वतःचे घर आहे. हा माझा एकटाच मुलगा. याला भाऊ-बहीण कोणीच नाही. वडील वारले म्हणून तो आला. त्याला ते घर त्याच्या नावावर करून हवे होते. मग त्याने विकून पैसे केले असते, पण मी म्हटले मी जिवंत असे पर्यंत ते माझ्या नावावरच राहील. त्यानंतर तू त्याचे काहीही कर. त्याने मला इथून आणून टाकले व बेघर केले."
"मावशी तुम्ही घाबरू नका. मी तुम्हाला व्यवस्थित घरी पोचवायची व्यवस्था करतो. करुणा, तू मावशी बरोबर जाऊ शकशील का ?"

रणजितला करुणाबद्दल खात्री होती. त्याच्या मनात तिच्याबद्दल प्रेम होते पण अजून ते व्यक्त करायला संधी मिळाली नव्हती. तिची ओळख झाल्यापासून तिचे वागणे, इतरांना मदत करणे, सर्वांना आपलेसे करण्याची वृत्ती त्याला फार भावली होती. त्याची आई त्याने लग्न करावे म्हणून मागे लागली होती. करुणा मनात होती. अनाथालयात वाढली होती, त्यामुळे आईला तिच्याबाबत कसे पटवावे याचा तो विचार करत होता. एकदा सहजपणे तिची व आई ची गाठ पडली तर तिचे रंगरूप व आपुलकीचे वागणे याची त्याच्या आईला नक्की भुरळ पडली असती याची त्याला खात्री होती. तो योग्य समय याची वाट पहात होता. आजचा प्रसंग व त्यातील करुणाचा सहभाग तो नक्कीच आईला वर्णन करून सांगणार होता.

करुणा आश्रमात वाढली, शिकली. दिसायला चांगली, अभ्यासात हुशार म्हणून शिक्षकांची आवडती. तिच्या एका शिक्षकाने तिला इथे जॉब मिळवून दिला. इथे सुद्धा ती सर्वांची आवडती होती कारण तिचा स्वभावच सर्वांना मदत करायचा व आपलेपणाने वागायचा असा होता. सगळी नाती मानलेली पण त्या मानलेल्या नात्यांतही तिला मान होता व प्रेम मिळत होते. त्याबद्दल ती देवाची आभारी होती. या सोज्वळ बाईकडे बघून तिला वाटले, मला माझी आईच माहीत नाही, आईचे प्रेम काय असते याचा अनुभव नाही म्हणून अपुरेपणा वाटतो, दुःख होते आणि या मुलाला आई जड झाली. किती नालायक आहे हा मुलगा !! तिने मनोमन ठरवले की या आईला तिच्या घरी नीट पोहोचवायचे. तिने मैत्रिणीकडे म्हटले, "लता, आता माझी ड्युटी संपते आहे. यांना मला त्यांच्या घरी नाशिकला घेऊन जायचे आहे, तर उद्या मी येऊ शकणार नाही. मी तुला फोन करून कळवते. प्लीज तू जरा बॉस ना सर्व सांग." तिने हो म्हटले, तशी करुणा अनसूयेला घेऊन निघाली.

"मावशी, टॉयलेटला जायचंय ना, चला." तिने त्यांना टॉयलेट दाखवले. नंतर त्यांच्यासाठी कॉफी व सँडविच मागवले. त्यांच्याबरोबर आपण पण कॉफी घेतली. अनसूयेने खुर्चीवर बसून सँडविच कॉफीचा समाचार घेतला. तिच्या चेहऱ्यावर जरा तरतरी आली. त्या तिला म्हणाल्या, "माझे पती वारले त्याला आता महिना झाला. वडील वारले कळल्यावर मुलगा लगेच आला. दिवस झाले तसे व्यवहार बघू लागला. माझ्या नावावर असलेली जमीन, बँकेची फिक्स डिपॉझिट सर्व त्याच्या स्वतःच्या नावावर करायला मागे लागला. मी म्हटले, माझ्या नावावर जे आहे ते माझ्या मागे तुझेच होणार आहे. पण मी असेपर्यंत हे घर माझ्या नावावरच राहणार." तर म्हणाला, "मी तुला आता माझ्याबरोबर नेणार. मग तू इथे कशी राहणार ? तेव्हा घर माझ्या नावावर कर."

"मी कदाचित मुलाच्या प्रेमाखातर त्याचे ऐकले असते पण सविता म्हणून माझी एक मैत्रीण आहे. अगदी जिवाभावाची. तिचा मुलगा बँकेत आहे. अतिशय हुशार, प्रेमळ तसेच मोठ्यांचा मान ठेवणारा आहे. त्याने मला सांगितले की तू घर त्याच्या नावावर केलेस की तो ते लगेच विकेल. त्याने गिऱ्हाईक पाहून ठेवले आहे व त्या माणसाने बँकेत लोनसाठी अर्जही दाखल केलेला आहे. मग तुला राहायला जागा राहणार नाही. तुला त्याने नाही नेले तर काय करशील ? आणि नेले पण तुला तिथे करमले नाही व परत यायचे असले तर तू काय करणार ? असे परतीचे दोर कापून जाऊ नकोस. तुझ्या मागे घर त्याचेच आहे. तिथे राहून सुद्धा घर त्याच्या नावे करता येईल. आता हा घोळ घालू नकोस. मी माझ्या मुलाला तसे सांगितले. त्यामुळे त्याने मला इथे आणून सोडून दिले. मी मुंबईला अपरिचित. मी परत कशी जाणार ? मग तो माझे घर, माझी संपत्ती हे माझ्या पतीने मुद्दाम माझ्या नावे केली, ती आपली करून घेईल. पोरी, या जगात माणसाला पैशाशिवाय मोठं काहीच दिसत नाही का ? आई वडिलांचे प्रेम, त्यांचे कष्ट, मुलांसाठी सोसलेले त्रास, श्रम याला काहीच किंमत नाही का ?"

करुणाला त्यांचे बोलणे ऐकून खूप वाईट वाटले ती म्हणाली, "मावशी काळजी करू नका. रणजित तिकिटे बूक करून कळवणार. आपण बसने नाशिकला जाऊया. तुमचा पत्ता सांगा. मी तुम्हाला तुमच्या घरी नीट पोचवेन आणि हो सविता मावशींची पण ओळख करून द्या. आता अगदी निश्चिंत राहा. ज्यांना आई नसते त्यांनाच आईची किंमत कळते." "असं का म्हणतेस ? तू माझ्याशी तू एवढ्या प्रेमाने वागत आहेस तर तुझ्या आईशी किती मायेने वागत असशील ?" करुणाचे डोळे पाण्याने भरले तसे अनसूया म्हणाली, "काय झाले मी तुला दुखवले का ?"
"अगं मावशी, माझी आईच मला माहीत नाही. मी अनाथालयात वाढले." अनुसूयाने तिला जवळ घेतले व म्हणाली, "आज पासून तू स्वतःला अनाथ समजू नकोस. आजपासून तू माझी मुलगी. मला मुलीची खूप आवड. देवाने आज ती पुरवली." थोड्याच वेळात रणजीतचा फोन आला. त्याने बस नंबर, बस सुटण्याची वेळ व सीट नंबर सांगितले. सकाळी साडेपाच वाजताची बस होती. करुणा म्हणाली चार वाजून गेले. आपण आता लगेच निघू. मला पण दादरला जाऊन बस कुठून सुटते त्याची चौकशी करावी लागेल. नाशिक जवळ येता येता त्या दोघीही उठल्या. बस बरोबर साडेपाच वाजता सुटली होती व दोघींनाही हलकी झोप लागली होती. नाशिक बस स्टेशनला बस थांबली. उतरून त्यांनी टॅक्सी केली व त्या घरी पोहोचल्या.

अनसूयाकडे घराची चावी होती. तिने घर उघडले. आत शिरताच ती सुखावली. तिचा जीव शांत झाला. एवढे मोठे घर बघून करुणा आनंदली. अनसूयाने आल्याबरोबर तिच्या मैत्रिणीला सविताला फोन केला. हिचा आवाज ऐकून सविताला आश्चर्यच वाटले. ती म्हणाली, "एवढ्यात न्यूयॉर्कला पोचलीस सुद्धा?" अनसूयाने म्हटले, "अगो, इथेच आमचे पंढरपूर ! मी घरी नाशिकला आले आहे. तुझी वाट बघते आहे." दहा मिनिटांत सविता तेथे पोहोचली. अनसूयाला बघून तिला आश्चर्य वाटले. अनसूयाने आपल्या मैत्रिणीला सर्व हकीकत सांगितली. करुणा लगेच निघायचे म्हणत होती. त्या दोघींनी तिला आग्रहाने थांबवले. फोन करून दोन दिवसांची रजा मंजूर करायला लावली. तसेच इन्स्पेक्टर रणजितला फोन लावायला सांगितले. अनसूयेने त्यांचे आभार मानले व नाशिकला यायचे आमंत्रण दिले. हे पण सांगितले की "करुणाची आई म्हणून सांगते की करुणाकडे लक्ष द्या. ते गुंड तिला त्रास देतील अशी मला भीती वाटते. मुलगा आता मला मेला. पण देवाने मला एक गुणी मुलगी दिली." त्यावर रणजित हसून म्हणाले, काळजी करू नका.

तिने सविताशी करुणाची ओळख करून दिली. करुणाने गाडीतून येताना तिची पूर्ण माहिती अनसूयाला दिली होती. ती तिने सविताला सांगितली. करुणाचे सविताने आभार मानले व देव तुला सर्व सुखे देवो' असे म्हणाली. मग जेवणे झाली. करुणाला सविता मावशी खूप आवडली. दोन दिवस आनंदात घालवून करुणा निघाली. जाताना अनसूयाला 'आई येते' असे म्हणाली तेव्हा अनसूयेचा उर भरून

आला. अनसूयेने तिला लाडू चिवड्याचा डबा व ड्रेस साठी म्हणून पैसे दिले व परत येताना नवीन ड्रेस घालून ये असे सांगितले. सविता रात्री मैत्रिणीकडेच राहिली. तिच्या मुलाने तिला सांगितले की थोडे दिवस रोज रात्री मावशीकडे झोपायला जा. तिला सोबतीची गरज आहे. खरेतर सून नोकरी करणारी असल्याने सविताला नातवंडांसाठी घरात सबंध दिवस राहणे गरजेचे होते.

रात्री झोप येत नव्हती तेव्हा अनुसूया सविताला म्हणाली, "यांनी किती बरोबर ओळखले होते रमेशला. मला म्हणाले होते मायेच्या जाळ्यात अडकून तोंडावर पडशील. ते खरे झाले. अग गेल्या वेळी सुनेच्या बाळंतपणासाठी आम्ही दोघे अमेरिकेला गेलो होतो ना तेव्हा त्या दोघांचा स्वभाव कळला. रमेश बायकोच्या मुठीत. तिला आम्ही नकोच. फक्त पैसा पाहिजे. तिनेच सांगितले होते की आता बाबा गेलेत. तुमचे घर विका आणि बँकेत काय डिपॉझिट असतील तेही कॅश करून आणा. त्यादिवशी तो बायकोशी बोलत होता. मी जवळच झोपले होते. त्याला वाटले मी गाढ झोपले आहे पण हे गेले तेव्हाच माझी झोप मला सोडून गेली. मी ते संभाषण ऐकले म्हणूनच सर्व सेविंग सर्टिफिकेट तुझ्या समीर कडे मुदत वाढवायला व माझ्या सही शिवाय कॅश करता येणार नाहीत असे करायला दिली. तरी बँकेतली सर्व रोकड तिकिटासाठी म्हणून मागून घेतली आणि तिकीट काढलेच नाही. याचे रिटर्न तिकीट होते. मला तिथे बाहेर उभे करून गेला. त्या अनोळखी मुंबईत आपल्या आईचे काय होईल हा विचारही त्याच्या मनी आला नाही. मूल व्हावे म्हणून किती उपास-तापास केले. त्याचे हट्ट पुरवले, उत्तम शिक्षण दिले. अमेरिकेत त्याला जायचेच होते म्हणून खर्च करून पाठवले. त्याचे तिकडे शिक्षण झाले. नोकरी लागली तरी आम्ही त्याच्याकडून पैशाची अपेक्षा केली नाही. त्याने तिथेच प्रेम लग्न केले तरी ती दोघे इथे आल्यावर कौतुकाने स्वागत समारंभ आयोजित केला. सुनेसाठी केलेले दागिने तिला दिले. तिकडे जाऊन तिचे बाळंतपण साग्रसंगीत केले पण या दोघांना आमचे प्रेम, आपलेपणा समजलाच नाही. त्या दिवशी ही करुणा भेटली म्हणून बरे नाहीतर त्या गुंडानी माझे पैसे दागिने लुटून मला मारून टाकले असते. तरीही कोणाला कळले नसते. असा पुत्र असण्यापेक्षा मी निपुत्रिक किंवा वांझ राहिले असते तर बरे झाले असते."

अनसुयाचा उद्वेग सहाजिकच होता. सविताने तिला थोपटले. ती म्हणाली "शांत हो. ज्याचे कोणी नसते त्याचा पाठीराखा देव असतो. म्हणूनच तुला करूणा भेटली. आता तू तिला मुलगी मानले आहेसच. तिला पण तुझ्यासारखी आई मिळाली हे बरे झाले."

तेवढ्यात फोनची रिंग वाजली. एवढ्या रात्री फोन कोणाचा? अनसूया विचारात पडली. सविता म्हणाली, "एवढ्या रात्री इथले कोणीच फोन करणार नाही. हा बाहेरचा फोन आहे. त्याची रिंग पण वेगळ्या तऱ्हेने वाजते आहे. रमेशच इथे फोन करून इथे कोण आहे का, तू पोचलीस का असे बघत असेल. इथे फोन लागला नाही की तो आमच्या घरी फोन करून चौकशी करेल." सविता हुशार होती.

अनसूयाला तिचे बोलणे पटले. त्यांनी फोन उचललाच नाही. अनसुया सविताशी बोलत राहिली. माझे कपडे बॅगेत भरत होते तेव्हा मला म्हणाला, "न्यूजर्सी ला खूप भारतीय आहेत. मराठी, गुजराती वगैरे. तिथे इथल्यासारखे सणवार साजरे करतात. आम्ही देवळात जातो. गणपती उत्सव, नवरात्र, दसरा सगळे सण साजरे करतो. तेव्हा तू तुझे दागिने बरोबर घे. तिथे घालायला मिळतील. मी दागिने आणले गं बँकेतून."
"मग तुझे दागिने पण दिलेस की काय त्याला?"
"हो घेणारच होता. तो मला म्हणाला, 'तुझ्या बॅगेत नको. माझ्या बागेत ठेवूया. तुझी बॅग हरवली तर?' आता एकत्र जाताना माझीच बॅग कशी हरवेल ? तरी मी हो म्हटले. पण तो त्याची बॅग बंद करणार तेवढ्यात बाहेर कोणीतरी आले म्हणून त्याला बाहेर जावे लागले आणि तेवढ्यात मी माझ्या दागिन्याचा डबा माझ्याच बॅगेत ठेवून दोन्ही बॅगा बंद केल्या व कुलपे लावली. त्यामुळे ते त्याच्या लक्षात आले नाही. निदान माझे दागिने माझ्याजवळ राहिले."

सविताला ते ऐकून रमेशचा तिरस्कार वाटला. आई-वडीलानी एवढे शिक्षण दिले. अमेरिकेला पाठवले. सुनेला नातवाला कौतुकाने सोने-नाणे दिले. त्यांच्याकडून कधी एका पैची अपेक्षा केली नाही. रमेशचे वडिल एका नावाजलेल्या कंपनीत वरच्या पोस्टवर होते. त्यांना पगारही उत्तमच होता. शिवाय शेतीवाडीचे उत्पन्न होते. ते अतिशय व्यवस्थित होते. त्यांनी पैशाची योग्यप्रकारे गुंतवणूक केली होती. त्यामुळे निवृत्तीनंतरही ते सुखवस्तूपणे रहात होते. त्यांनी काश्मीर, केरळ, राजस्थान अशा सहली केल्या. सुनेच्या बाळंतपणासाठी मुलाने बोलावले म्हणून अमेरिकेला गेले ते स्वखर्चाने. त्यांनी नेहमी गरीब विद्यार्थ्यांना मदतीचा हात दिला, वृद्धाश्रमाला देणगी दिली, श्रद्धानंद महिलाश्रमात गेली कित्येक वर्षे त्याची भाऊबीज पोचत असे. अशा माणसाच्या पोटी हा करंटा कसा जन्मला, असे त्यांना वाटले. दुसऱ्या दिवशी सकाळी घरी गेल्यावर मुलाला व सुनेला रमेशबद्दल सर्व सांगितले. फोनबद्दल पण सांगितले. त्या म्हणाल्या, "आता थोडे दिवस तो घरी परत परत फोन करेल आणि तो उचलला नाही हे लक्षात आले की आपल्या घरी नक्कीच फोन करून चौकशी करेल. त्याचा फोन आला तर प्रवास कसा झाला? मावशी कशी आहे? अशी तिची चौकशी करायची म्हणजे त्याला वाटेल की तो तिला मुंबईला सोडून गेला आणि ती घरी पोचलीच नाही. मग तो पुढे काय करतो ते पाहू. माझी अटकळ अशी आहे की तो जमेल तसे इथे येईल व तिचे घर पैसे यांची वसुली करायला बघेल. मग आपण त्याची धिंड काढू. मला त्याचा एवढा राग आला आहे की काही विचारू नकोस."

सविता रोज रात्री अनुसूया कडे झोपायला येत असे. तिने अंदाज केल्याप्रमाणे चार दिवसांनी रात्री परत अशीच रिंग वाजली. त्यांनी फोन उचलला नाही. असे चार-पाच वेळा झाले. त्यानंतर एका रात्री सविताच्या घरी फोन वाजला. तिच्या मुलाने समीरने फोन उचलला व म्हणाला, "हॅलो कोण बोलतंय?"

"मी रमेश. सहजच फोन केला. सविता मावशी कशी आहे?'
"'आई झोपली आहे. अनसूया मावशी कशी आहे ? प्रवास नीट झाला ना ? आई काळजी करीत होती. आईला तिच्याशी बोलायला आवडेल. आहे का ती फोन जवळ? मी आईला बोलावतो."
तसे रमेश म्हणाला, "आई अजून झोपली आहे. तिचा जेट लॅग अजून गेला नाही. बरे मी ठेवतो फोन." समीरला खरेच रमेशची चीड आली. आईला वाऱ्यावर सोडून गेला. तिचे काय झाले असेल याची या नालायकाला पर्वा नाही. झोपली आहे म्हणे. जेटलॅग अजून गेला नाही. काय सफाईदार खोटे बोलतो हा. दुसऱ्या दिवशी सविता घरी गेल्यावर समीरने तिला रात्रीच्या फोनबद्दल सांगितले. ती म्हणाली, "बघितलेस, माझा अंदाज खरा ठरला. आता तो कधी तरी इथे येईलच तेव्हा काय करायचे ते आतापासूनच ठरवून ठेवले पाहिजे." सविताने या फोनबद्दल अनसूयाला सांगितले.

अनसूया करुणाला नेहमी फोन करायची .करूणा पण तिला न विसरता फोन करायची. एकदा रणजितला कामासाठी नाशिकला यायचे होते तेव्हा तोही अनसूयेला भेटायला आला. तिला फार बरे वाटले. तिने त्याचे व करुणाचे कौतुक केले. त्याच्या वागण्या बोलण्यातून त्याला करुणा बद्दल खास आकर्षण असावे असे तिला वाटले. तिने त्याला सांगितले की करुणा आता अनाथ नाही. मी तिला माझी मुलगी मानते. तिच्यासाठी योग्य वर शोध मी तिचे लग्न लावून देईन. रणजितला हे ऐकून बरे वाटले.

एकदा करुणा अनाथाश्रमातल्या बाईंना घेऊन नाशिकला आली. त्यांना नाशिकला एक वृद्धाश्रम काढायचा होता. या इथे कोणाला तरी भेटायला व जागेची पहाणी करायला आल्या होत्या. त्यांना अनसूया आवडली. त्या म्हणाल्या, "अनसूया ताई, तुम्ही इथे एकट्याच राहता. तुमच्याबरोबर काहीजणी इथे राहिल्या तर तुम्हाला चालेल का ? तुमचे घर मोठे आहे. चार ते पाच बायकांची सहज सोय होईल. त्या काही कामे करतील. सर्वांनी एकत्र जेवायचे, खेळीमेळीने राहायचे. प्रत्येकालाच सोबतीची गरज असते. जमेल का बघा." अनसूयेला कल्पना आवडली पण ती म्हणाली, "चार बायका एकत्र येऊन भांडण करायला लागल्या तर ते मला जमणार नाही." सविताही तिथे होती. ती म्हणाली, "अनसूया शांत स्वभावाची आहे. तिला भांडण आवडत नाही." त्यावर बाई म्हणाल्या, "अनसूया ताई इथल्या मुख्य तुम्हीच. जर तुम्हाला कोणाचे वागणे पसंत पडले नाही तर त्यांना तुम्ही जा म्हणू शकता. त्याबद्दल मी तुम्हाला नक्कीच मदत करीन. तुमच्या या छोट्या वृद्धाश्रमावर माझे पूर्ण लक्ष असेल."

हे बोलणे झाले, त्यानंतर दोन आठवड्यातच दोन बायकांना घेऊन करूणा आली. त्या दोघींची स्थिती साधारण अनसूया सारखीच होती. एकीला तिचे सर्व दागिने व पैसे लुटून सुनेने बाहेरचा रस्ता दाखवला होता. तर दुसरीची जागा मुलीने व जावयाने हिरावून घेतली होती. अनसूयेला ते ऐकून वाईट

वाटले. आपल्या नवऱ्याने मुलाला व सुनेला बरोबर ओळखून आपली सोय आधीच करून ठेवली. तसे यांच्या नवऱ्याने केले नाही. आपल्या मुलांना ते ओळखू शकले नाहीत व आपली सर्व मिळकत मुलांना देऊन बसले. त्यांच्यामागे या वनवासी झाल्या. दोघीही आता तिच्याबरोबर राहू लागल्या. एकीचे हात उत्तम चकल्या करीत तर दुसरीच्या पोळ्या मऊसूत होत. सविताने त्यांना चकली व पुरणपोळीच्या ऑर्डर्स आणून दिल्या. हळू हळू इतर फराळ व भाजी-पोळीचा रोजचा डबा अशीही कामे मिळू लागली. त्यांचा वेळ कारणी लागत होता. स्वतःच्या उपजीविकेचा भार उचलला जात होता. भांडण वाद यांना वेळच नव्हता. अनसूयेने त्यांना दोन वेगळ्या खोल्या दिल्या होत्या. त्यातच त्यांनी सर्व करावे असे ठरवून दिले होते. त्यांची मिळकत, त्यांचा खर्च याचा विचार करून घराचे भाडे, वीज, पाणी, गॅस यांच्या बिलापोटी त्यानी किती पैसे द्यावे हे त्या बाईने येऊन ठरवून दिले होते. दोघींची दोन्ही कामे सुरू होती. एकमेकींना मदत करीत. त्यांचे चांगले चालले होते. अनसूयेला ही सोबत झाली होती.

आणि एक दिवस सवितेच्या अंदाजाप्रमाणे उगवला. अनसुयेच्या घराची बेल वाजली. अनसुया आंघोळीला गेली होती. चकलीवालीने दार उघडले. अनोळखी माणूस बघून तिने दार बंद केले व अनुसयाला जाऊन सांगितले की सुटातला एक पुरुष आणि पॅन्ट वाली एक बाई मोठ्या दोन बॅगा घेऊन बाहेर उभे आहेत. अनसूयेने तिला सांगितले, "तू जा तुझ्या कामाला. मी बघते." तिला अंदाज आला म्हणून तिने आधी सविताला फोन करुन तिच्या कानावर घातले. सविता म्हणाली "मी येते तू दार उघडू नकोस." सविता आली व बाहेर रेखा व रमेशला बघून म्हणाली, "तुम्ही आलात आणि माझी अनसूया कुठे?" त्याबरोबर रमेशचा चेहरा उतरला. रेखाने डोळ्यात अश्रू आणत म्हटले, "आईना तिकडली हवा मानवली नाही. त्या वारल्या."

"अरेरे फार वाईट झाले. आता तू आधी माझ्या घरी चल."

"कशाला मी आमच्या घरी जातो." रमेश म्हणाला.

तसे सविता ने सांगितले, "जागा रिकामी होती. तुझ्या वडिलांची इच्छा होती म्हणून सध्या तिथे वृद्धाश्रम सुरू केला आहे. आता तू आलास तेव्हा पुढे काय करायचे ते ठरवू. आता तू माझ्याकडे चल."

रमेश नाईलाजाने तिच्याबरोबर त्यांच्या घरी गेला. रमेश सविताला म्हणाला, "मावशी आम्हाला आठवड्यात परत जायचं आहे. तत्पूर्वी मला हे घर विकायचे आहे आणि आईच्या नावावरची बँक डिपॉझिट पण कॅश करायची आहेत. मला इथे परत परत येणे शक्य नाही."

त्यावर सविता म्हणाली, "बरोबर आहे. तिकिटाला वीस पंचवीस हजार पडतात ना? माझा समीर बँकेत आहे. तो तुझे सर्व काम पटकन करून देईल. प्रवासाहून आला आहेस. चार घास खा. आमच्या भारतीय पाहुणचाराचा आस्वाद घ्या. दुपारी विश्रांती घ्या. संध्याकाळी समीर आला की सर्व काम होईल. पण आईचे डेथ सर्टिफिकेट आणले आहेस ना?"

"हो तर. मी ते घेऊन आलोय."

सविताला त्याच्या निर्लज्ज खोटेपणाची चीड आली पण तिने तसे दाखवले नाही. समीरने तिला पूर्वीच सांगितले होते की डेथ सर्टिफिकेट शिवाय त्याला काहीच करता येणार नाही पण जिवंत आईचे डेथ सर्टिफिकेट मिळवण्यापर्यंत यांची मजल गेली हे पाहून तिला त्याची घृणा वाटली. तिने समीरला फोन करून सर्व कळवले व संध्याकाळी घरी येताना प्रतिष्ठित वकील सरंजामे, जे रमेशच्या वडिलांचे सर्व मिळकतीचे, वकिलीचे व्यवहार बघत त्यांना व आणखी दोघा प्रतिष्ठित व्यक्तींना घेउन यायला सांगितले. पूर्वीच सरंजामे वकिलांना भेटून तिने अनसूयाबद्दल सर्व सांगितले होते. श्री. गोडबोले यांचे ते जवळचे मित्र, सल्ला देणारे व सर्व व्यवहार बघत बघणारे वकील होते. रमेशने पण अमेरिकेला जाण्यापूर्वी त्यांना भेटून आपण आईला अमेरिकेला घेऊन जातोय तेव्हा घर विकायचे आहे व डिपॉझिट कॅश करायची आहेत असे सांगितले होते. पण जयंत गोडबोले यांनी आपल्या मित्राला विश्वासात घेऊन आपला मुलगा व सून यांच्या स्वभावाची कल्पना दिली होती. ते अमेरिकेला गेले होते तेव्हा त्यांनी मुलाचा व सुनेचा पूर्ण अनुभव घेतला. त्यांची पत्नी अनसूया साधी व पुत्रप्रेमाला आसुसलेली असल्याने आपल्यामागे त्याच्या गोड बोलण्याला भुलून सहजपणे ती सर्व संपत्ती त्याच्या नावे करील व तिचे हाल होतील. त्यामुळे आपण गेलो तरी ती मरेपर्यंत त्याच्या हाती काही पडू नये अशी कायदेशीर व्यवस्था करायला त्यानी सरंजामेंना सांगितले होते. रमेशने अनसूयेला मुंबई विमानतळावर एकटीला सोडून तो एकटाच अमेरिकेला गेला व केवळ एका सहृदय मुलीमुळे व रणजित सारख्या कर्तव्यदक्ष इन्स्पेक्टर मुळे ती गुंडाच्या कचाट्यातून सुटून सुखरूप घरी पोचली हे सविता कडून कळल्यावर त्यांना रमेशबद्दल तिरस्कार वाटला. आपल्या मित्राने स्वतःच्या मुलाला पुरते जाणले होते असेच त्यांना वाटले. सविताच्या म्हणण्याप्रमाणे तो कधीही तिचे डेथ सर्टिफिकेट घेऊन पैसे वसूल करायला येईल हे त्यांनाही पटले होते. आज तो आल्याबरोबर सविताने त्याना निरोप पाठवला व आपल्या घरी बोलावले. संध्याकाळी सरंजामे वकील व आणखी चार गोडबोले यांच्या ओळखीचे सज्जन गृहस्थ समीरबरोबर घरी आले.

संध्याकाळी हे सर्व आल्यावर सविताने रमेश व त्याची बायको रेखा यांना बाहेर बोलावले. सरंजामेनी रमेशची चौकशी केली व आईबद्दल काय असे विचारले, तर त्याची जीभ पटकन वळेना कारण सरंजामे वकिलांना त्याने लहानपणापासून पाहिले होते. जबर गुंडही त्यांच्या नजरेला नजर देऊ शकत नसत. त्यांच्या पुढे खोटे बोलणे त्याला जमण्यासारखे नव्हते. ते काम त्याच्या बायकोने चटकन केले कारण तिला कसलेच सोयरसुतक नव्हते. तिने खोटे रडण्याचे नाटक करून त्यांना तिथली हवा मानवली नाही व त्या वारल्या. असे सांगितले. मग तू त्यांचे डेथ-सर्टिफिकेट आणले असशीलच असे त्यांनी विचारले. त्याबरोबर तिने ते काढून दिले.

त्याचे असे झाले होते त्याचे असे झाले होते की रमेश ची बायको रेखा शेजारच्या रेवती सोबत जिथे डेथ सर्टिफिकेट देतात त्या एडिसन काउंटीच्या ऑफिस मध्ये पोहोचली. रेवतीबेन ची मावशी गेली

पंधरा वर्षे तिच्याकडे राहात होती. ती नुकतीच वारली होती. रेवतीने रेखाला आपल्या बरोबर येण्याची विनंती केली. तिथे पोचल्यावर रेखाला आपल्या सासूचे मुंबईलाच काहीतरी बरेवाईट झाले असणार म्हणूनच ती नाशिकला पोहोचू शकली नसणार हे आठवले. आपण इथून डेथ सर्टिफिकेट मिळवले तर सासूची सर्व संपत्ती सहज आपल्या हाती येईल असा महत्त्वाकांक्षी विचार तिच्या मनात आला. तिने तिथे सासूच्या नावाचा डेथ सर्टिफिकेटचा फॉर्म भरला आणि डेथ सर्टिफिकेट मिळवण्याचा प्रयत्न केला पण स्टॅम्प मारून कन्फर्मेशन मिळवण्यासाठी तिचे दहन अथवा अंत्यविधी कोणी कुठे केले याचा पुरावा मागितला, तो तिला देता आला नाही कारण अंत्यविधी करणाऱ्या भटजींची सही लागते. त्यामुळे तिचा फॉर्म रिजेक्ट झाला पण त्या अपूर्ण डेथ सर्टिफिकेटवर, तिने रेवतीकडचे सर्टिफिकेट बघून आपणच खोटी सही केली व त्यावर एडिसनचा स्टॅम्प नाही हे लक्षात घेतले नाही. रमेशलाही ते खरेच वाटले पण तज्ञ डोळ्यांना त्याचा खोटेपणा समजला असता हे तिच्या ध्यानात आले नाही. तेव्हा त्यांचा मुलगा श्याम दहा दिवसांसाठी डिस्नेलँडच्या ट्रीपला शाळेतर्फे गेला तेव्हा ती दोघे लगबगीने इथे आली.

सरंजामे वकिलानी ते हातात धरले व म्हणाले, "हे सर्टिफिकेट कुठल्या गावचे आहे या वर कोणाची सही आहे त्यांच्या ऑफिसचा स्टॅम्प असायला पाहिजे. तो दिसत नाही. हे सर्व खरे आहे ना? की तुझ्या बायकोने खोटी सही करून आणले आहे ? मावशी खरेच वारल्या की उगाच सांगताय?" सरंजामेनी असे विचारायला आणि अनसूयाबाईंनी तिथे प्रवेश करायला एकच गाठ पडली.
"अनुसयाबाई तुम्ही? तुम्ही कुठून आलात? तुमच्या मुलाने व सुनेने तुम्हाला स्वर्गवासी करून तुमचं डेथ सर्टिफिकेट पण एवढ्या लांबून अमेरिकेहून आणलेले आहे. काय प्रकार आहे?" बाकीचे लोकही आश्चर्याने व तिरस्काराने रमेशकडे बघू लागले. रमेश मान खाली घालून बसला. तर सून डोळे विस्फारून सासूकडे बघू लागली.

तेव्हा अनुसयाबाई पुढे होऊन म्हणाल्या, "याने मला अमेरिकेला नेतो असे सांगून मुंबईला नेले व तेथे विमानतळावर मला एकटीला सोडून नाहीसा झाला. मुंबईच्या महासागरात, गुंडांच्या महानगरीत आपल्या साध्यासुध्या आईचे काय होईल याचा विचारही त्याला शिवला नाही. त्याने मला तिथे मरायलाच सोडले होते. म्हणून तो माझे डेथ सर्टिफिकेट घेऊन आला. पण 'देव तारी त्याला कोण मारी' असे म्हणतात त्याचाच मला प्रत्यय आला. माझा मुलगा त्या दिवशीच मला मेला, पण देवाने मला एक गुणी मुलगी दिली. तिने मला सुखरूप माझ्या घरी पोचवले."
"पण मी किती वेळा फोन केला घरी. तू उचलला कसा नाहीस?" रमेशने विचारले.
"अवेळी फोन करणारा माझ्या मुलगा मेला होता. त्यामुळे परक्याचे फोन घ्यायची मला इच्छा नव्हती." अनसूयेने पटकन सांगितले.
"अच्छा म्हणजे आई घरी पोहोचली नाही हे तुला कळले तेव्हा ती कुठेतरी खपली असेल व तिची

इस्टेट तुला मिळायची तर तिचे डेथ सर्टिफिकेट पाहिजे. म्हणून हे खोटे डेथ सर्टिफिकेट घेऊन तू इथे आलास." सरंजामे वकील कडक आवाजात म्हणाले. "आता याचा उपयोग करून मी तुला आयुष्यातून उठवू शकतो. आताच मी तुझ्या काउंटी हेडला फोन करून त्यांच्या सहीचे हे खोटे डेथ सर्टिफिकेट माझ्याकडे आले आहे ते कळवतो व ते कोणी तयार केले याचा शोध घ्यायला सांगतो. म्हणजे तुला परत अमेरिकेत जाताच येणार नाही. आता इथे तर तुला जागाच नाही. बाहेर पडशील तर इथले लोक तुला दगडाने ठेचून काढतील. कारण देवीसारख्या आईवर अन्याय करून ती जिवंत असताना मेल्याचे जाहीर केलेस. काय करू ते सांग?"

आपल्या पत्नीच्या नादाने आपण  किती नीचपणा केला हे रमेशला आता समजले. त्याला मेल्याहून मेल्यासारखे झाले. अनसूया म्हणाली, "माझा मुलगा सहा महिन्यापूर्वीच मला मेला... आता इथे परत येऊन आपले काळे तोंड दाखवण्यापेक्षा आताच्या आता इथून चालते व्हा. इथे तुम्हाला क्षणभरही थांबण्याची गरज नाही." समीरने त्यांच्या बॅगा त्यांच्या पुढे आणून ठेवल्या. एकही शब्द न बोलता दोघं घराबाहेर पडली. अनसूया सविताच्या गळ्यात पडून रडायला लागली. सरंजामे वकील म्हणाले, "ताई असा मुलगा असण्यापेक्षा नसलेलाच बरा. त्याच्या जाण्याचा शोक करू नका. तुमच्या धाडसाचे व कणखर वागण्याचे मला अतिशय कौतुक वाटते." बाकीच्या सर्वांनीही सरंजामे यांच्या बोलण्यावर संमतीची मोहोर उठवली.

रमेश घराबाहेर पडून रस्त्यावर जाताना पत्नीला शिव्या देत म्हणाला, "अशा तऱ्हेने आईला त्रास द्यायला लावून तुला काय मिळाले ? तुझ्या प्रेमाने मी पण आंधळा झालो. उद्या आपला शाम सुद्धा आपली हीच अवस्था करणार याची मला खात्री वाटते. तू स्वतः एक आई आहेस याचाही तुला विसर पडला ना. स्वतःला शहाणी समजत होतीस त्याचे परिणाम. " रमेशचे चालण्यात लक्ष नव्हते. एका रिक्षाची ठोकर बसता बसता तो वाचला. रेखाने त्याला घट्ट धरले. एक टॅक्सी थांबवली. आपण बसली. सामान ड्रायव्हरने डिकीत टाकले. वेड्यासारखे हातवारे करणाऱ्या रमेशला बळेच टॅक्सीत बसवून तिने मुंबई एअरपोर्टचा पत्ता सांगितला. एवढी मोठी सवारी मिळाली म्हणून तो शिख ड्रायवर खूष झाला. पण आता आपल्या नवऱ्याला वेड लागले की काय या कल्पनेनेच पुढे कसे होणार या विचाराने रेखा कासावीस झाली. आतापर्यंत पत्नीच्या काळजीने तळमळणारे जयंत गोडबोले यांचा आत्मा मात्र मुक्त झाला.

**नलिनी करंडे**

**(पहिले बक्षीस - कथा स्पर्धा 'गृहलक्ष्मी' सप्टेंबर २०१३)**